MHPU080001712024

नि. फौ. ख. क्र. ६१/२०२४
सरकार
वि.
राहुल उर्फ लल्ल्या हिरामण लष्करे व इतर

## निशाणी क्रमांक १७ वरील आदेश

१. अर्जदार संतोष दामु लोखंडे हे प्लॉट नं.६०५, काटे इस्टेट, ९ वा मजला, चोविसावाडी, च–होली, ता. हवेली, जि. पुणे येथील रहिवाशी असुन त्यांनी पोलीस स्टेशन दिघी येथे गु.र.नं. ४०२/२०२३ भा.दं.वि. कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अंतर्गत अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविलेला आहे. सदर अर्जाचे अवलोकन केले असता प्रामुख्याने असे निदर्शनास येते की, दिनांक २६/०८/२०२३ रोजी अर्जदार घराबाहेर चिंचवड येथे गेले असता अज्ञात आरोपींनी घराचे कुलूप तोडुन अर्जदार यांच्या घरामधुन १) सोन्याचे २३.८५० ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे गंठण अंदाजे ७२,०००/– रुपये, २) सोन्याचे ४०.१७३ ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे लॉकेट चैन अंदाजे १,२१,०००/– रुपये, ३) सोन्याचा १०.४५० ग्रॅम वजनाचा गळयातील सोन्याचा नेकलेस अंदाजे ३२,०००/– रुपये चोरी करुन नेला होता. सदर सोन्याचे दागिने पोलिसांनी गुन्हयामध्ये जप्त केलेले असुन आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले आहे व नियमित फौजदारी खटला क्र. ६१/२०२४ आरोपींविरुध्द प्रलंबित आहे. सबब, वर नमुद केलेले सोन्याचे दागिने परत मिळणेकरीता अर्जदाराने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ अंतर्गत सदर अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जावर विद्वान सरकारी वकिलांचे म्हणणे मागविण्यात आले होते. सरकारी वकिलांनी त्यांच्या खुलाश्यात नमुद केले की, अर्जदार यांनी दाखल केलेल्या सोने खरेदीच्या पावत्यांवर ज्वेलर्सची सही व शिक्का नाही. तसेच, अर्जदार यांना सोन्याचे दागिने परत केले तर ते विकण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती सरकारी वकीलांनी केलेली आहे.

३. तपासी अंमलदाराने अर्जास म्हणणे सादर केलेले असून अर्जदाराचे जप्त दागिने अर्जदारास परत केल्यास त्यास कोणतीही हरकत नाही असे नमुद केलेले आहे.

४. अर्जदारातर्फे विद्वान वकिल श्रीमती कचरे यांना ऐकले तसेच संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रामुख्याने असे निदर्शनास येते की, अर्जदाराने पोलीस स्टेशन दिघी येथे गु.र.नं. ४०२/२०२३ भा.दं.वि. कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अंतर्गत अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविलेला आहे व त्याचे पुढीलप्रमाणे १) सोन्याचे २३.८५० ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे गंठण अंदाजे ७२,०००/– रुपये, २) सोन्याचे ४०.१७३ ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे लॉकेट चैन अंदाजे १,२१,०००/– रुपये, ३) सोन्याचा १०.४५० ग्रॅम वजनाचा गळयातील सोन्याचा नेकलेस अंदाजे ३२,०००/– रुपयांचा चोरी गेला होता असे नमुद केले आहे. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता पोलिसांनी आरोपींकडुन १) सोन्याचे २३.८५० ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे गंठण अंदाजे ७२,०००/– रुपये, २) सोन्याचे ४०.१७३ ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे लॉकेट चैन अंदाजे १,२१,०००/– रुपये, ३) सोन्याचा १०.४५० ग्रॅम वजनाचा गळयातील सोन्याचा नेकलेस अंदाजे ३२,०००/– रुपये जप्त केलेले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदाराने दागिने खरेदी केल्याबाबतचे बिल देखील अभिलेखावर दाखल केले आहे. येथे नमुद करणे गरजेचे आहे की, अर्जदाराव्यतिरीक्त इतर कोणीही सदर सोन्याच्या दागिन्यांची मागणी केलेली नाही. सदर विशिष्ट बाब लक्षात घेता वर नमुद १) सोन्याचे २३.८५० ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे गंठण अंदाजे ७२,०००/– रुपये, २) सोन्याचे ४०.१७३ ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे लॉकेट चैन अंदाजे १,२१,०००/– रुपये, ३) सोन्याचा १०.४५० ग्रॅम वजनाचा गळयातील सोन्याचा नेकलेस अंदाजे ३२,०००/– रुपये यांचे मालक अर्जदार आहे ही बाब प्रथमदर्शनी निदर्शनास येते. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाचे **Sunderbhai Ambalal Desai Vs/ State of Gujrat AIR 2003 SC 638,** मधील मागदर्शक तत्वांचा विचार करता अर्जदाराचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे व तो अर्जात नमुद १) सोन्याचे २३.८५० ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे गंठण अंदाजे ७२,०००/– रुपये, २) सोन्याचे ४०.१७३ ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे लॉकेट चैन अंदाजे १,२१,०००/– रुपये, ३) सोन्याचा १०.४५० ग्रॅम वजनाचा गळयातील सोन्याचा नेकलेस अंदाजे ३२,०००/– रुपयांचा मिळण्यास पात्र आहे असे माझे मत झालेले आहे. सबब, मी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज (निशाणी क्र.१७) मंजूर करण्यात येतो .

२. दिघी पोलिस स्टेशन गु.र.नं. ४०२/२०२३ भा.दं.वि. कलम ४५४, ३८० सह कलम ३४ मध्ये जप्त केलेले १) सोन्याचे २३.८५० ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे गंठण अंदाजे ७२,०००/– रुपये, २) सोन्याचे ४०.१७३ ग्रॅम वजनाचे गळयातील सोन्याचे लॉकेट चैन अंदाजे १,२१,०००/– रुपये, ३) सोन्याचा १०.४५० ग्रॅम वजनाचा गळयातील सोन्याचा नेकलेस अंदाजे ३२,०००/– रुपये एवढा मुद्देमाल हा अर्जदार संतोष दामु लोखंडे, रा. प्लॉट नं.६०५, काटे इस्टेट, ९ वा मजला, चोविसावाडी, च–होली, ता. हवेली, जि. पुणे यांचेकडे २,५०,०००/– रुपयांचा बॉण्ड घेवुन खालील अटी व शर्तीवर सुपुर्द करण्यात येतो.

३. ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे दिघी, यांना असे निर्देशित करण्यात येते की, वर उल्लेखित मुद्देमाल अर्जदार यांना सुपूर्द करण्यात यावा. तसेच त्यांनी मुद्देमाल सुपूर्द करण्यापुर्वी त्याचे छायाचित्र काढावे, सदर छायाचित्र व पंचनाम्याची प्रत प्रस्तुत प्रकरणात तसेच नि.फौ.ख.क्र.६१/२०२४ मध्ये दाखल करावी. मुद्देमालाच्या छायाचित्रावर अर्जदाराने साक्षांकित करुन स्वाक्षरी करावी. छायाचित्र काढण्याचा खर्च अर्जदाराने स्वतः करावा.

४. अर्जदाराने त्याला सोन्याचे दागिने मिळाल्याची पोहोच पावती दागिने मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत नि.फौ.ख.क्र.६१/२०२४ मध्ये दाखल करावी.

५. अर्जदाराने सदर सोन्याचे दागिने नि.फौ.ख.क्र.६१/२०२४ प्रलंबित असेपावेतो किंवा पुढील आदेशापावेतो कोणासही विकुन विल्हेवाट लावू नये.

LALIT VASANTRAO SHRIKHANDE

Digitally signed by LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Date: 2026.07.02 15:50:08 +0530

(एल. व्ही. श्रीखंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. ३, खडकी, पुणे.

दिनांकः– ०२/०७/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Gupte (Grade- III) |
| Name of the Court | : | Shri. L. V. Shrikhande,<br>J.M.F.C. Court No. 3, Khadki,<br>Pune |
| Date | : | 02.07.2026 |
| Order signed by the Presiding officer on | : | 02.07.2026 |
| Order uploaded on | : | 02.07.2026 |